**BDC LIBRARY**
**News Paper Clipping**
**A.Y. 2025-26**

ePaper नवराष्ट्र Paschim Maharashtra | 08 January 2026 | Page 3 | navarashtra.com

# श्रमसंस्कार शिबिरात कष्टाचे महत्त्व कळते

## सामाजिक : प्रा. कोंडीबा शिंदे यांचे मत; ढोरोशीत राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे उदघाटन

▸ पाटण (वा) स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी सातत्याने कष्ट केलेच पाहिजेत. राष्ट्रीय सेवा योजनेच्या श्रम संस्कार शिबिरातून आजच्या पिढीला कष्टाचे महत्त्व समजते. कष्टाशिवाय फळ मिळत नाही, असे मत राष्ट्रीय सेवा योजनेचे सातारा जिल्हा समन्वयक प्रा. कोंडीबा शिंदे यांनी व्यक्त केले.

येथील बाळासाहेब देसाई महाविद्यालयाच्या ढोरोशी येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रम संस्कार शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कोयना शिक्षण संस्थेचे सदस्य शरद देशमुख होते. संस्थेचे संचालक संजीव चव्हाण, प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. ए. कळंत्रे, ढोरोशी गावच्या उपसरपंच सुवर्णा मगर, बारामती येथील डॉ. आर. टी. सपकाळ यांची प्रमुख उपस्थिती होती.




प्रा. शिंदे म्हणाले, प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्याची क्षमता निर्माण होण्यासाठी श्रमसंस्कार शिबिरांचे आयोजन व सहभाग गरजेचा आहे. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. लक्ष्मण गणगे यांनी प्रास्ताविक केले. कनिष्ठ विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. बजरंग चव्हाण यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. डॉ. एस. एस. कुंभार यांनी सूत्रसंचालन केले. वरिष्ठ कार्यक्रम अधिकारी डॉ. भरत जाधव यांनी आभार मानले. कार्यक्रमास शामराव मगर, अण्णा पुजारी, राहुल पुजारी, प्राचार्य अनिल मोहिते, प्रा. प्रदीप गायकवाड, प्रा. विशाल कांबळे यांच्यासह विद्यार्थी, कर्मचारी उपस्थित होते.

### कठीण परिस्थितीत तडजोड करण्याचे धडे गिरविता येतात

संजीव चव्हाण म्हणाले, श्रमसंस्कार शिबिरातून जीवनाचे वास्तव शिक्षण मिळते. कठीण परिस्थितीत तडजोड करण्याचे धडे गिरविता येऊ शकतात. शरद देशमुख म्हणाले, एनएसएसच्या माध्यमातून व्यक्तिमत्व विकास होऊन आत्मविश्वास वाढतो. विद्यार्थ्यांनी अशा शिबिरात सहभागी झाली पाहिजे. श्रमसंस्कार शिबिरातून युवकांचा व समाजाचा विकास होतो.